ePaper

शिंदे-फडणवीस सरकारकडून सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्या



| वर्ष - 7 | अंक -38 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत

- ‘आयटीयन्स’चे आरोग्य धोक्यात!
- पुणे लोकसभेच्या जागेवर काँग्रेस ठाम!
- पुण्यात मोठा प्रकल्प येणार!

www.mahaenews.com | रविवार, दि. 4 जून 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# शिरूर लोकसभा निवडणुकीची चर्चा

# भाचेजावयांमध्येच टक्कर!

## » अजितदादांच्या बालेकिल्ल्यात वर्चस्वाचं राजकारण

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**विधानसभा निवडणूक २०१४ चा काळ.. अजितदादांनी आपला समर्थक राहिलेल्या नेत्यालाच लक्ष केलं... ज्यांना भांग पाडता येत नाहीत, ते विधानसभेचं तिकीट मागतात, असा टोला लगावला. अजितदादांचा घाव वर्मी लागला आणि आमदार होऊनच कार्यकर्त्याने बदला घेतला. हा तडफदार आमदार म्हणजे महेश लांडगे... हेच महेश लांडगे आता शिरूरमधून लोकसभेसाठी इच्छुक आहेत. अशातच महेश लांडगेंच्या मामांचेही भावी खासदार म्हणून बॅनर लागलेत. विलास लांडे लोकसभेच्या मैदानात उतरल्यावर भाचे जावयांमधील राजकीय संघर्ष पुन्हा पेटू शकतो..**

विलास लांडे भोसरीचे आमदार झाल्यावर महेश लांडगेंनी त्यांच्या नेतृत्वात काम केलं. महेश लांडगेंनी विधानसभेच्या उमेदवारीवर दावा केल्याने दोघांमध्ये अंतर वाढलं. राष्ट्रवादीने उमेदवारी नाकारल्यावरही लांडगेंनी माघार न घेता झुंज दिली.. राष्ट्रवादीच्या बालेकिल्ल्यात ताकद लावून राजकारण यशस्वी केलं








### शिरूर लोकसभेसाठी राष्ट्रवादीत पक्षांतर्गत लढाई

शिरूर लोकसभा मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेसचा उमेदवार कोण असेल, याची चाचपणी सुरू झाली आहे. विद्यमान खासदार डॉ. अमोल कोल्हे यांच्याबरोबरच माजी मंत्री दिलीप वळसे पाटील यांचे नाव चर्चेत असतानाच माजी आमदार विलास लांडे यांनीही शिरूर लोकसभा मतदारसंघातून निवडणूक लढविण्यासंदर्भात दंड थोपटले आहेत. त्यामुळे शिरूर लोकसभा मतदारसंघात पक्षांतर्गतच इच्छुकांची संख्या वाढत असल्याने पक्षनेतृत्वापुढे उमेदवार निवडीचा पेच निर्माण होण्याची शक्यता आहे.

आगामी लोकसभा निवडणुकीच्या दृष्टीने राष्ट्रवादी काँग्रेसकडून मतदारसंघाची आढावा बैठक घेण्यात आली. पक्ष संघटना मजबूत करण्याबरोबरच लोकसभा निवडणुकीच्या संभाव्य उमेदवारांच्या नावाची चर्चाही या बैठकीत करण्यात आली. त्यावेळी शिरूर लोकसभा मतदारसंघातून माजी मंत्री दिलीप वळसे पाटील यांचेही नाव पुढे आल्याची चर्चा राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांमध्ये सुरू झाली आहे. दिलीप वळसे पाटील सध्या परदेश दौऱ्यावर आहेत. ते पाच जून नंतर येणार आहेत. त्यानंतरच ते शिरूर लोकसभा मतदारसंघातून निवडून लढविण्यास इच्छुक आहेत की नाही, हे स्पष्ट होईल. मात्र विद्यमान खासदार डॉ. अमोल कोल्हे निवडून लढविणार नसल्याची चर्चा सातत्याने होत असल्याने दिलीप वळसे पाटील यांचे नाव पुढे आल्याचे राष्ट्रवादी काँग्रेसमधून सांगण्यात आले.

### लांडे आणि लांडगेंचा राजकीय संघर्ष

» विलास लाडे आणि महेश लांडगे हे भाचे जावई आहेत... मधल्या काळात महेश लांडगेंनी मामांच्या छत्र छायेखालीच काम केलं.. पण पुढे मामा भाचे आमनेसामने आले. विलास लांडे आणि महेश लांडगेंचा राजकीय संघर्ष पाहिला तर....

» २००४ ला महेश लांडगे पिंपरी चिंचवड महानगर पालिकेत पहिल्यांदा नगरसेवक

» २००७, २०१२ लाही विजयी, स्थायी समिती अध्यक्ष पद सांभाळलं

» २०१४ ला राष्ट्रवादीकडे उमेदवारीची मागणी पण तिकीट नाकाल्यावर अपक्ष लढण्याचा निर्णय

» विधानसभेच्या विजयानंतर २०१६ ला भाजपमध्ये प्रवेश

» २०१७ ला पिंपरी चिंचवड महानरपालिकेत सत्ता खेचून आणण्यात सिंहाचा वाटा

» शिरूर लोकसभेसाठी भाजपकडून मोर्चबांधणी, महेश लांडगेंची लढण्याची तयारी

» पक्षाने विश्वास दाखल्यास लांडे-लांडगे भाचेजावयांमध्ये सामना होण्याची शक्यता

» कधीकाळी समर्थक असलेले महेश लांडगे आता पिंपरी चिंचवडमध्ये अजित दादांनाच टक्कर देताना दिसतात.. लांडे आणि लांडगे लोकसभेच्या मैदानात उतरणार का? हे पाहणे औत्सुक्याचे आहे.

### राष्ट्रवादी कुणाला उमेदवारी देणार?

» शिरूर लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. अमोल कोल्हे आहेत. मात्र अमोल कोल्हे राष्ट्रवादी काँग्रेसवर नाराज असून त्यांची भारतीय जनता पक्षाच्या नेत्यांबरोबरची जवळीक वाढत आहे. त्यामुळे ते भाजपमध्ये प्रवेश करतील, अशी चर्चा गेल्या काही दिवसांपासून सातत्याने होत आहे. या चर्चेत कोणतेही तथ्य नसल्याचे अमोल कोल्हे यांनी स्पष्ट केले आहे. शिरूर लोकसभा मतदारसंघातून माजी मंत्र दिलीप वळसे पाटील यांनी निवडणूक लढवावी, अशी मागणी करण्यात करण्यात आली होती. मात्र त्यांनी निवडणूक लढविली नाही. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांचे विश्वासू अशी दिलीप वळसे पाटील यांची ओळख आहे. त्यामुळे शिरूरमधून राष्ट्रवादी काँग्रेस नक्की कोणाला उमेदवारी देणार, याबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे.

# पुणे लोकसभेच्या जागेवर काँग्रेस ठाम!

## कोणत्याही प्रकारची तडजोड नाही: प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केले

## पुणे लोकसभेच्या जागेबाबत मुंबईत काँग्रेसची बैठक उत्साहात

**| पुणे | महाईन्यूज | प्रतिनिधी|**

**सभामहाविकास आघाडीतील मित्रपक्ष राष्ट्रवादी काँग्रेसने पुणे लोकसभा मतदारसंघावर दावा केला असला, तरी कोणत्याही परिस्थितीत पुण्याची जागा लढविण्याचा ठाम निर्धार काँग्रेसने केला आहे. याबाबत कोणत्याही प्रकारची तडजोड केली जाणार नसल्याचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी स्पष्ट केले आहे. पुणे लोकसभेच्या जागेबाबत मुंबईत काँग्रेसची बैठक झाली. या बैठकीत पुण्याच्या जागेवर हक्क कायम ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला.**

पुणे लोकसभेच्या जागेबाबत मुंबईत काँग्रेसची बैठक झाली. या बैठकीत पुण्याच्या जागेवर हक्क कायम ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला. पुणे लोकसभा मतदारसंघातील काँग्रेसची ताकद कशी आहे, हे स्थानिक पदाधिकाऱ्यांकडून मुंबईच्या बैठकीत मांडण्यात आले. कोणत्याही परिस्थितीत लोकसभेची पुण्याची जागा काँग्रेसच लढविण्याची आग्रही भूमिका या बैठकीत स्थानिक पदाधिकाऱ्यांनी घेतली. त्याला अनुमोदन देत प्रदेशाध्यक्ष पटोले यांनी पुण्याच्या जागेबाबत कोणत्याही प्रकारची तडजोड केली जाणार नाही. ही जागा काँग्रेसच लढवेल, असे बैठकीत स्पष्ट केले. या पार्श्वभूमीवर पुणे लोकसभा मतदारसंघावरून राष्ट्रवादी काँग्रेस-काँग्रेस पुन्हा आमने-सामने येण्याची शक्यता आहे.




राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवार यांनी पुणे लोकसभा मतदारसंघावर दावा केला होता. पुण्यात काँग्रेसपेक्षा राष्ट्रवादी काँग्रेसची जास्त ताकद आहे. पक्षाचे दोन आमदार असून ४० नगरसेवक आहेत. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसची ताकद जास्त असल्याने पुण्याची जागा राष्ट्रवादी काँग्रेस लढविणार आहे, असे पवार यांनी जाहीर केले होते. त्यांच्या या भूमिकेनंतर काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये रस्सीखेच सुरू झाली आहे. दरम्यान, आगामी लोकसभा निवडणुकीसाठी जेमतेम वर्षभराचा कालावधी आहे. त्यामुळे राजकीय पक्षांकडून निवडणुकीची तयारी सुरू करण्यात आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसनंतर काँग्रेसकडूनही मतदारसंघनिहाय आढावा बैठक सुरू झाली आहे. पुणे लोकसभेचा आढावा मुंबई येथे शनिवारी सकाळी घेण्यात आला. त्या बैठकीत कोणत्याही परिस्थितीत पुण्याची जागा राष्ट्रवादी काँग्रेसला न देण्याची भूमिका काँग्रेसने घेतली आहे.

> “पुणे लोकसभा जागा काँग्रेसकडेच राहणार असल्याचा आणि ही जागा लढविण्याचा निर्णय पक्षाच्या मुंबईतील बैठकीत एकमताने घेण्यात आला. त्यामुळे ही जागा कोणत्याही परिस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेसला दिली जाणार नाही.
>
> – **मोहन जोशी,** माजी आमदार



### काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये रस्सीखेच

» राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवार यांनी पुणे लोकसभा मतदारसंघावर दावा केला होता. पुण्यात काँग्रेसपेक्षा राष्ट्रवादी काँग्रेसची जास्त ताकद आहे. पक्षाचे दोन आमदार असून ४० नगरसेवक आहेत. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसची ताकद जास्त असल्याने पुण्याची जागा राष्ट्रवादी काँग्रेस लढविणार आहे, असे अजित पवार यांनी जाहीर केले होते. त्यांच्या या भूमिकेनंतर काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये रस्सीखेच सुरू झाली आहे. काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस आघाडीच्या जागा वाटपानुसार राष्ट्रवादी काँग्रेसकडे जिल्ह्यातील चार पैकी तीन लोकसभा मतदारसंघ आहेत.

---

# हलाखीच्या परिस्थितीत लढली, आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचं नेतृत्व!

## मेंढपाळाच्या कन्येची भरारी: बारामतीच्या रेश्मा पुणेकरला शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार जाहीर

**| पुणे | महाईन्यूज**

**आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचं प्रतिनिधित्व करणाऱ्या बारामतीच्या रेश्मा पुणेकरला महाराष्ट्र सरकारचा सर्वोच्च शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.अतिशय खडतर परिस्थितीतून पुढे येत बेसबॉलमध्ये आंतरराष्ट्रीय सामन्यात भारतीय संघाचं कर्णधार पद सांभाळणाऱ्या बारामतीच्या रेश्मा पुणेकरला महाराष्ट्र सरकारचा सर्वोच्च शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार जाहीर झाला आहे.**

**तिच्या या यशाबद्दल तिचं सर्व स्तरातून कौतुक होत आहे.**

पुरस्कारासाठी ३० जून रोजी संपणारं वर्ष धरून त्या पूर्वीच्या पाच वर्षांपैकी तीन वर्षांमध्ये त्या खेळाडूने राज्य, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरांवर केलेल्या कामगिरीचं आणि क्रीडानैपुण्याचं मूल्यमापन केलं जातं.

ग्रामीण भागातून येऊन देशाचं कर्णधारपद स्वीकारून प्रतिनिधित्व करणारी रेश्मा पुणेकरने तिच्या कुटुंबासह देशाचीही शान वाढवली आहे. रेश्माने घरच्या आर्थिक परिस्थितीवर मात करत जिद्द, चिकाटी आणि आत्मविश्वासाच्या जोरावर आजपर्यंत दोन आंतरराष्ट्रीय





सामने चीन आणि हॉंगकॉंग या देशामध्ये खेळले आहेत. तिने २३ राष्ट्रीय सामन्यात महाराष्ट्राच्या संघाचं प्रतिनिधित्व केलेलं आहे.

२८ राज्यस्तरीय सामने तसंच ४ सुवर्ण पदकं, ६ रजत पदकं, तीन कास्य पदक आणि रागिणी पुरस्कार, राज्यस्तरीय खेलरत्न पुरस्कार, सरदार धुळोजी मोरे वीरता पुरस्कार अशा अनेक पुरस्कारांनी रेश्माला सन्मानित करण्यात आलं आहे. आजपर्यंत रेशमाचा तब्बल बारा वर्षांचा खेळातील प्रवास हा ग्रामीण भागातील तरुणांसाठी प्रेरणादायी आहे. तिने केलेली प्रचंड मेहनत, कष्ट यामुळेच रेश्मा केवळ बारामतीच नव्हे तर देशाचं नाव बेसबॉल या खेळामध्ये उंचावत आहे. सध्या रेश्मा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथील शारीरिक शिक्षण विभागात एम. पी. एडचा अभ्यास करत आहे. ग्रामीण भागातील आंतरराष्ट्रीय खेळाडूला महाराष्ट्र राज्य सरकारचा सर्वोच्च शिव छत्रपति राज्य क्रिडा पुरस्कार जाहीर झाल्यामुळे तिचं सर्वत्र कौतुक होत आहे.

### बारामतीच्या लेकीचा देशाबाहेर डंका

» रेश्माने अतिशय हलाखीच्या परिस्थितीत इतकं मोठं यश मिळवलं आहे. लहानपणापासून मेंढ्यांच्या मागे काठी घेऊन धावणारी रेश्मा आज देशाचं प्रतिनिधित्व आंतरराष्ट्रीय स्तरावर करत आहे. बारामतीच्या पवारवाडी या दुष्काळी भागात राहणाऱ्या रेश्माचे वडील मेंढपाल असून त्यांनी रेश्माच्या खेळासाठी तिला नेहमीच प्रोत्साहन दिलं. रेश्माचे वडील शिवाजी पुणेकर यांनी आपल्या लेकीच्या खेळासाठी मेंढ्या विकल्या, आपलं शेतही विकलं होतं. रेश्माने वडिलांच्या कष्टाचं चीज करत मेहनत, जिद्दीच्या जोरावर गरुड भरारी घेतली आहे.

# ‘आयटीयन्स’चे आरोग्य धोक्यात!

## उच्चभ्रू सोसायटीतील रहिवाशांवर दुर्गंधी युक्त दूषित पाणी पिण्याची नामुष्की

### डासांचे प्रमाणही वाढल्याने नागरिकांच्या जिवाशी खेळ सुरू

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**माहिती तंत्रज्ञानामुळे जगभर प्रसिद्ध झालेल्या ल उच्चभ्रू सोसायटीतील रहिवाशांवर व स्थानिक नागरिकांवर प्रचंड दुर्गंधी सुटलेले दूषित पाणी पिण्याची नामुष्की ओढवली आहे. गावलगतच्या मुळा नदीपात्रातील पाण्याचा प्रवाह गेल्या काही महिन्यांपासून वाहता नसल्याने साठलेल्या पाण्याला मोठ्या प्रमाणात दुर्गंधी आली आहे. डासांचे प्रमाणही वाढल्याने नागरिकांच्या जिवाशी खेळ सुरू आहे.**





नदीपात्राला हिरवा रंग प्राप्त झाला आहे. ते पाणी पिऊन व रोगराईमुळे नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. येथील जलसृष्टीदेखील नामशेष होण्याच्या मार्गावर आहे. त्यामुळे नदीपात्रातील रोगराईला आमंत्रण देणारे व पर्यावरणाचा समतोल बिघडवणारे हे दूषित पाणी जाण्यासाठी ते वाहते असण्याची गरज आहे. त्यासाठी मुळशी धरणातून पाण्याचा विसर्ग करावा तसेच मुळा नदीलगतची गावे नदीचेच पाणी पितात. त्यामुळे या पाण्याचे ऑडिटदेखील करण्याची मागणी करण्यात आली आहे.

हिंजवडीचे माजी सरपंच आणि विद्यमान सदस्य विक्रम साखरे यांनी जिल्हाधिकारी राजेश देशमुख व खासदार सुप्रिया सुळे यांना निवेदन दिले आहे. हिंजवडी येथील ब्ल्यू रिज ही सुमारे दोन हजार सदनिका व दहा हजारांहून अधिक नागरिक वास्तव्यास असलेली प्रचंड मोठी टाउनशिप या मुळा नदीकिनारी वसली आहे. आयटीमुळे प्रचंड डेव्हलपमेंट झाल्याने आजूबाजूला मोठे शहरीकरण झाले आहे. हे सर्व नागरिक याच नदीतील पाणी पिण्यासाठी व वापरण्यासाठी घेतात.

### परिसरातील शेतकरीसुद्धा संतापले

» नदीचे पाणी मोठ्या प्रमाणावर प्रदूषित झाल्याने विशेष म्हणजे ते शेतीलासुद्धा वापरता येत नसल्याने परिसरातील शेतकरीसुद्धा संताप व्यक्त करत आहेत. पाणी वाहते राहिल्याने स्वच्छ राहील. मात्र, सध्या ते वापरण्या व पिण्यायोग्य राहिले नाही. पावसाळ्यापर्यंत अधून-मधून पाणी सोडल्यास नदी पात्रातील शेवाळ, राडारोडा, जलपर्णी निघून जाईल. दुर्गंधी येणार नाही, असे अनेकांनी मत व्यक्त केले.

---

# पतीच्या दीर्घायुष्यासाठी महिलांचे साकडे!

## » पिंपरी-चिंचवड शहरात ठिकठिकाणी धाग्याचे सात फेरे बांधत वडाची पूजा

। पिंपरी । महाईन्यूज

**जन्मोजन्मी हाच पती मिळावा, यासाठी वटपौर्णिमेला सुवासिनींनी वडाची पूजा करून, पतीच्या दीर्घायुष्यासाठी साकडे घातले. यानिमित्त सकाळपासून शहरातील ठिकठिकाणच्या वटवृक्षासभोवताली सुहासिनींनी पूजेसाठी गर्दी केली होती. वडाला धाग्याचे सात फेर बांधत पतीच्या दीर्घायुष्याची कामना केली. त्यानंतर दान-दक्षिणा देत सुवासिनींनी एकमेकींना सौभाग्याचं लेणं हळद-कुंकू लावून, आंब्यांचे वाण देऊन ओटी भरल्या. मनोभावे सौभाग्यवतींनी पूजा केली.**

### उद्यानात महिलांची गर्दी

पिंपरी, चिंचवड, आकुर्डी, मासुळकर कॉलनी, भोसरी, कासारवाडी आदी भागांमध्ये असणाऱ्या वडाच्या झाडांची पूजा करण्यासाठी शनिवारी (ता. ३) महिलांनी गर्दी केली. वटपौर्णिमेनिमित्त महिलांकडून एकमेकींना शुभेच्छाही दिल्या जात होत्या. सिद्धार्थ गौतम बुद्ध उद्यानातील डेरेदार वटवृक्षांची पूजा करण्यासाठी महिला वर्गाची झुंबड उडाली होती. त्या ठिकाणी उत्सवाचे रूप आले होते. मंदिराच्या ठिकाणी केळी, सफरचंद, आंबा, जांभूळ आदी वटपौर्णिमेच्या पूजेच्या वस्तूंच्या खरेदीसाठी बाजारपेठेत महिलांची गर्दी झाली होती. परिसरात दुपारपर्यंत वडाची पूजा आटोपल्यानंतर घराघरांत जाऊन वाण देण्यासाठी महिलांची धावपळ सुरू होती. वटपौर्णिमेच्या दिवशी चोरीचे प्रमाण अधिक असते. त्यामुळे श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज प्रतिष्ठानचे कार्यकर्ते महिलांच्या सुरक्षेसाठी तैनात होते. तसेच नोकरदार महिलांनी बाजारातून वडाची फांदी आणून घरीच पूजा केली. चिखली येथील महात्मा फुलेनगरमधील श्री गणेश मंदिराच्या प्रांगणात मोठ्या वटवृक्षाखाली सुहासिनींची गर्दी झाली होती. परिसरात राहणाऱ्या सुवासिनींनी बाजारातून वडाची फांदी आणून घरीच किंवा अपार्टमेंटच्या बेसमेंटमध्ये, मोकळ्या पटांगणात पूजा न करता परंपरेनुसार वडाच्या झाडाला सुवासिनींनी सात फेरे मारीत धागा बांधला. वटपौर्णिमेनिमित्त महिलांकडून एकमेकींना शुभेच्छाही दिल्या जात होत्या



### श्री स्वामी समर्थ मंदिर वटवृक्षाची पूजा

»शिवतेजनगर चिंचवडमधील श्री स्वामी समर्थ मंदिरासमोर असलेल्या वटवृक्षाची पूजा करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर महिलांनी गर्दी केली. सर्व महिलांनी नटून थटून वटवृक्षाची मनोभावे पूजा केली. तसेच वडाला फेऱ्या मारत, हाच पती सात जन्म मिळावा, अशा पद्धतीची पूजा त्यांनी केली. श्री स्वामी समर्थ प्रतिष्ठानच्यावतीने महिलांचे स्वागत करण्यात आले.

# उधळण्याचे नाव "उबुंटू"




'उबुंटू' आफ्रिकेतील एक सर्वांगसुंदर गोष्ट आहे.वस्तुतः ही आफ्रिकेची एक विशिष्ट संस्कृती म्हणजे 'उबुंटू संस्कृती'शी आपली ओळख करून देते.एका मानववंशशास्त्रज्ञाने आफ्रिकेतील आदिवासी मुलांना एक खेळ खेळावयास सांगितला.त्याने मिठाईची एक टोपली एका झाडाजवळ ठेवली आणि मुलांना सांगितले की त्यांनी झाडापासून शंभर मीटरच्या अंतरावर उभे राहावे. मग त्या शास्त्रज्ञाने जाहीर केले की जो ही पळत जाऊन सर्वात आधी झाडाजवळ पोहोचेल,मिठाईची टोपली त्याची होईल.या नंतर मुलांना हाक मारीत तो म्हणाला,'तयार आहात ना..! आता पळा बरं लवकर..!' तुम्हाला ठाऊक आहे,मुलांनी काय केलं ते? त्या मुलांनी एकमेकांचा हात पकडला आणि सोबत मिळून झाडाकडे पळत सुटले.त्यांनी मिठाई परस्परांमध्ये समान वाटून घेतली,आणि भरपूर आनंद साजरा करत ते खाऊ लागले. जेव्हा शास्त्रज्ञाने त्यांच्याकडून असे करण्याचे कारण जाणून घेण्याची इच्छा व्यक्त केली,

तेव्हा ती मुलं म्हणाली- उबुंटू,ज्याचा अर्थ होता- 'आमच्यातला कुणी एकजणच कसा आनंद साजरा करू शकतो,जोवर बाकीची मुलं दुःखी आहेत?' त्यांच्या बोलीभाषेत 'उबुंटू' चा अर्थ आहे- ' मी आहे,कारण आम्ही आहोत!' हा सगळ्या पिढ्यांसाठी एक मोठा संदेश बनू शकतो. आपल्यातल्या प्रत्येकाचे वागणे असेच असते तर आपण जिथे जाऊ तिथे आनंदाला उधाण आले असते! आपले जीवनदेखील एक 'उबुंटू' जीवन असते...तर आपणही म्हणू शकलो असतो... मी आहे...कारण की आम्ही आहोत ! सध्या आपण सगळेच दिसणाऱ्या क्षणिक सुखाच्या मागे लागण्याच्या स्पर्धेत सहभागी झालो आहोत ,त्यामुळे आम्ही,आपण या सामूहिक भावनेचा,संस्काराचा विसर आपल्याला पडला आहे. जोवर बाकीचे लोक म्हणजे आपल्या सभोवताल कुणीतरी दुखी आहे तोवर मला आनंद घेण्याचा अधिकार कसा काय असू शकतो ही सामूहिक कर्तव्याची भावना उबुंटू मागे आहे ती आपल्या प्रत्येकात यायला हवी.

केवळ भारतीय संस्कृती तेवढीच चांगली आणि जगात घडत असते ते सगळे वाईट असे म्हणता येणार नाही कारण आपण जगच बघितलेले नसते आपण ज्या परिसरात असतो त्यालाच आपले जग मानून जगणे सुरु असते. माणूस जिथे वसलेला असेल त्या त्या भागात उन्नत मानवी सभ्यता नक्कीच असते. काही नाती आणि कर्तव्ये शब्दांच्या पलीकडे असतात.मानव पहिल्यांदा जेव्हा पृथ्वीवर आला त्याकाळात कदाचित तो एकटा असेल मात्र आईच्या पोटात त्याचे बंध आईशी नाळेच्या माध्यमातून जुळलेले असतात त्यामुळे मी पण



गाळून पडण्याची सुरुवात तिथूनच होते. मधला काहीकाळ त्याला मी पणाची बाधा नक्कीच होते मात्र हा मी पणा मर्यादित काळाचा पाहुणा असल्याचे लक्षात आल्यावर मनुष्य सामूहिक प्रेरणा शोधायला लागतो. कुटुंबाच्या सोबत राहून जो आनंद मिळतो आणि त्यातून जी मानसिक जडणघडण होत जाते हे अदृश्य कोचिंग मनुष्याला पुढे संस्कारित करीत असते.

आनंद,सुख किंवा मजा एकट्याला ओरबाडता येऊ शकते ,अनेक लोक तसा प्रयत्न नेहमीच करीत असतात मात्र असा एकट्याने घेतलेला आनंद दीर्घकाळ टिकत नाही कारण मनाच्या अनंत अवस्था या आनंदाच्या पुनरावृत्तीचा प्रत्यय देत नाहीत. मी च्या ठिकाणी आम्ही किंवा आपण जेव्हा तयार व्हायला लागतील तेव्हा हाच आनंद कित्येक पटीने वाढत जातो. आदिमानवाच्या अवस्थेत सुद्धा मनुष्य टोळ्या करून राहायचा ,या टोळीतही सामूहिक आनंदाचा प्रत्यय यायचा. सुख,दुःख आणि साहस सुद्धा जेव्हा सामूहिक भावनेने वाटले जाते त्यावेळी दुःख कमी होते, आनंद वाढत जातो आणि साहस सहज शक्य होते. मी पणात छोटेसे कार्यही डोंगराच्या एवढे वाटायला लागते ,यालाच सोबतीला चार हात लागले तर गप्पांच्या ओघात कठीण कार्यसुद्धा सहज पार पडते हा आपल्याला आलेला अनुभव असतो. उबुंटू हा त्याचेच प्रतीक असेल तर आपणही जगण्याच्या प्रत्येक क्षणी त्याचा वापर करायला हवा.

कोणत्याही गोष्टीत एकट्याला जो आनंद मिळतो त्या तुलनेत सामूहिक कार्यात मिळणारा आनंद आणि समाधान खूप मोठे असते. जगभर ज्या चळवळी निर्माण होऊन यशस्वी झाल्या त्याचे मर्म मी पणात नव्हे तर आम्ही किंवाआपण या शब्दात दडलेले आहे.दक्षिण आफ्रिका असू दे किंवा सुदान मुले सगळीकडेच निष्पाप आणि निर्व्याज असतात. शेयरिंग त्यांना बालपणापासूनच शिकवले जाते ,जिथे शिकवले जात नाही तिथे मुले सवंगड्यांच्या चेहऱ्यावरील आनंद वाचून हा संस्कार आत्मसात करीत असतात.ओरबाडणे,हिसकावून घेणे याला शरीराची ताकद लागते मात्र देणे,किंवा समर्पण,मदत यासाठी मनाच्या ताकदीची कसोटी लागत असते. ओरबाडल्याने कदाचित आसुरी आनंदाची अनुभूती होईल परंतु देण्यामुळे चिरकाल टिकणारा आनंद आणि समाधान आपल्या व्यक्तिमत्वात मोलाचे बदल घडवून आणण्यास कारणीभूत ठरू शकतात. उबुंटू हे संपर्कात येणाऱ्या प्रत्येकाला उधळून देण्याचे दुसरे नाव आहे.

## संपादकीय »

### गुणवत्तेचे सार्वत्रीकरण

***'दहावीला यंदा १५.२९ लाख विद्यार्थी बसले. त्यांपैकी १४.३४ लाख विद्यार्थी उत्तीर्ण झाले. गेल्या काही वर्षांपासून मुलींची कामगिरी मुलग्यांपेक्षा सरस होत आहे.***

उच्च शिक्षणाच्या संधी मर्यादित असतानाच्या काळात म्हणजे तीन-चार दशकांपूर्वीपर्यंत 'गाळणी परीक्षा' म्हणून दहावीच्या परीक्षेला एक महत्त्व होते; ते आता राहिलेले नाही. कारण शिक्षणाचा परीघ विस्तारत गेला. शिक्षण घेण्याबद्दलच्या आशा-आकांक्षाही वाढल्या. दहावीनंतरच्या शिक्षणाच्या सोयी मोठ्या प्रमाणात वाढल्या, छोट्या शहरांत आणि गावांतही महाविद्यालये सुरू झाली. दहावी आणि बारावीच्या बोर्ड परीक्षांत उत्तीर्ण होण्यासाठीच्या; तसेच त्यांमध्ये उत्तम गुण मिळविण्याच्या कौशल्यांचेही सार्वत्रीकरण होत गेले. त्यामुळे गेल्या काही वर्षांत या परीक्षांतील उत्तीर्णांचे प्रमाण नव्वद टक्क्यांहून अधिक आहे. काही मंडळी याला 'गुणवत्तेचा फुगवटा' म्हणतात; परंतु प्रत्यक्षात त्याला असे गुण मिळविण्याचे तंत्र विद्यार्थ्यांत मोठ्या प्रमाणात विकसित होत असल्याचे द्योतक म्हणावे लागेल.

**बुद्धिमत्तेला चालना देण्याच्या प्रक्रियेला समस्याधारित शिक्षणाची जोड मिळाली की सांघिक कार्याला बळ मिळते. सॉफ्टवेअर उद्योगात हे अत्यंत आवश्यक आहे, असे मत बेनेट विद्यापीठाच्या स्कूल ऑफ इंजिनीअरिंग अँड अप्लाइड सायन्सेसचे सहायक प्राध्यापक अपूर्व मिश्रा यांनी मांडले आहे. बुद्धिमत्तेला चालना देण्याच्या प्रक्रियेला समस्याधारित शिक्षणाची जोड मिळाली की सांघिक कार्याला बळ मिळते.**

## सॉफ्टवेअर उद्योगात समस्याधारित शिक्षण अत्यावश्यक

सॉफ्टवेअर उद्योगात हे अत्यंत आवश्यक आहे, असे मत बेनेट विद्यापीठाच्या स्कूल ऑफ इंजिनीअरिंग अँड अप्लाइड सायन्सेसचे सहायक प्राध्यापक अपूर्व मिश्रा यांनी मांडले आहे. २१व्या शतकात कम्प्युटर सायन्स इंजिनीअरिंग हे वेगाने विकसित होणारे क्षेत्र ठरले आहे. मशिन लर्निंग, डीप लर्निंग, डेटा सायन्स, कृत्रिम बुद्धिमत्ता, बिग डेटा, क्लाउड कम्प्युटिंग, रोबोटिक्स, ब्लॉकचेन इत्यादी बहुतांश उद्योगांमधील परवलीच्या शब्दांचे मूळ कम्प्युटर सायन्स इंजिनीअरिंगमध्ये सापडते. 'नॅशनल असोसिएशन ऑफ सॉफ्टवेअर अँड सर्व्हिसेस कंपनीज'च्या (नॅसकॉम) ताज्या अहवालानुसार, सन २०१९-२० या आर्थिक वर्षात भारताच्या माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात नऊ टक्क्यांनी वाढ होणार आहे. आगामी काळात विविध उद्योग, संशोधन क्षेत्रात तसेच उद्योजक म्हणून कम्प्युटर सायन्स इंजिनीअरना प्रचंड संधी उपलब्ध होणार आहेत. अर्थात काही आव्हाने देखील असतीलच. या क्षेत्रात यशस्वी उद्योजक होण्यासाठी त्या-त्या वेळी उद्भवणाऱ्या समस्यांना सामोरे जाण्यासाठी उत्तम



तांत्रिक कौशल्याबरोबरच अभिनव विचार करण्याची मानसिक क्षमता देखील असणे आवश्यक आहे. ही क्षमता विकसित करण्यासाठी समस्याधारित शिक्षण पद्धती उपयुक्त ठरते. समस्याधारित शिक्षणामध्ये (पीबीएल) विद्यार्थी वास्तव जगातील समस्यांना सामोरा जातो. एखाद्या समस्येवर मात करण्यासाठी रूढ मार्गाऐवजी नवीन मार्ग चोखाळत सर्वांपेक्षा वेगळे मात्र शक्य असे उपाय शोधण्याची संधी विद्यार्थ्यांना दिली जाते. या प्रक्रियेमुळे विद्यार्थ्यांची केवळ सर्जनशीलता आणि समस्या सोडवण्याचे कौशल्यच विकसित होत नाही, तर त्यांना संकल्पनेची स्पष्ट समज देखील येते. वास्तवातील समस्यांशी निगडित मर्यादांना सामोरे जाण्याची संधी देखील विद्यार्थ्यांना मिळते. समस्याधारित शिक्षणाचे तंत्र विद्यार्थ्याला शिक्षणाच्या प्रक्रियेचे बहुतांश नियंत्रण पुरवते.

## ।। अभंगवाणी ।।



अइकाल परी ऐसें नव्हे बाई ।
न संडा या सोई भ्रताराची ॥१॥
नव्हे आराणुक लौकिकापासून ।
आपुल्या आपण गोविलें तें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# पुण्यात मोठा प्रकल्प येणार!

## बड्या कंपनीचा शिंदे-फडणवीस सरकारसोबत करार, नोकऱ्यांची संधी

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**'कर्जसुविधा देण्याबरोबरच वित्तीय व्यवहार करणाऱ्या कंपन्यांमध्ये देशात आघाडीच्या समजल्या जाणाऱ्या 'बजाज फिनसर्व्ह' कंपनीने पुण्यात पाच हजार कोटी रुपयांची गुंतवणूक केली आहे. त्याबाबत राज्य सरकारशी 'बजाज फिनसर्व्ह' कंपनीने करार केला असून, मुंढवा येथे १९ एकर जागेत कंपनीच्या मुख्यालयाच्या कार्यक्षेत्रात सेवाप्रकल्प उभारला जाणार आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मिती होण्यास मदत होणार आहे.**



यासंदर्भात राज्य सरकार आणि बजाज फिनसर्व्ह यांच्यामध्ये शनिवारी करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या आहेत. उद्योग विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे आणि बजाज फिनसर्व्ह कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी एस. श्रीनिवासन यांनी करारावर स्वाक्षऱ्या केल्या आहेत. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि बजाज फिनसर्व्ह कंपनीचे मुख्य व्यवस्थापकीय संचालक संजीव बजाज उपस्थित होते. या करारामुळे रोजगार निर्मितीबरोबर पुण्याच्या विकासात भर पडणार आहे; तसेच अन्य कंपन्यांना गुंतवणुकीसाठी प्रोत्साहन मिळण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. आयटी धोरणानुसार, फिनटेक कंपन्यांना सहकार्य केले जाणार आहे.

राज्य सरकारने माहिती तंत्रज्ञान सुविधेबाबतचे (आयटी) धोरण जाहीर केले आहे. त्यानंतर आता पुण्यातील परिसरांमध्ये मोठ्या कंपन्यांनी गुंतवणूक करण्यास सुरुवात केल्याचे या करारावरून समोर आल्याचे बोलले जात आहे.

### मुंढव्यात 19 एकरमध्ये प्रकल्प

बजाज फिनसर्व्ह कंपनीमार्फत देण्यात येणाऱ्या कर्जासह विविध प्रकारच्या विमांची प्रक्रिया ही मुंढव्यातून केली जाणार आहे. त्या सेवेत तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणात वापर केला जात आहे. आयटी क्षेत्राशी निगडित दहा हजार नोकरदार; तसेच अन्य सेवा देणारे दहा हजार अशा सुमारे २० हजार तरुणांना पुढील पाच वर्षांत रोजगार मिळण्याची संधी आहे.

तंत्रज्ञानावर आधारित, कमी वेळेत कर्ज सुविधा देणारी कंपनी म्हणून नावारूपाला आलेल्या या कंपनीचा आयटीचा बॅकअप, सर्व्हर्स मुंढव्यातील इमारतीत ठेवण्यात येणार आहेत. कर्ज सुविधेबाबतची सर्व प्रक्रिया ही आता एकाच ठिकाणाहून चालविली जाणार आहे. बजाज फिनसर्व्ह कंपनीमार्फत लवकरच म्युच्युअल फंडही सुरू होणार आहे, त्याचे कार्यालयही मुंढव्यात असणार आहे. बजाज कंपनीच्या मालकीच्या १९ एकर जागेत ही कंपनी उभी राहणार आहे.

### सरकारकडून कोणती मदत मिळणार?

- आयटी धोरणानुसार राज्य सरकार बजाज फिनसर्व्ह कंपनीला बांधकाम परवानग्या मिळवून देणार.
- तीन टॉवर इमारतीसाठी अतिरिक्त प्रीमिअम शुल्कात ५० टक्के सवलत.
- पाच एफएसआय मिळणार.
- पर्यावरण विभागाची परवानगी मिळवून देणार.
- इमारतीच्या काही प्रमाणात व्यावसायिक वापरास परवानगी.
- औद्योगिक दराने वीज दरआकारणी.

"आर्थिक सेवा क्षेत्रातील देशातील सर्वांत मोठी गुंतवणूक महाराष्ट्रात होत आहे. महाराष्ट्र सरकार आणि बजाज फिनसर्व्ह यांच्यात सुमारे पाच हजार कोटी रुपये गुंतवणुकीचा करार, 'बजाज फिनसर्व्ह'चे अध्यक्ष संजीव बजाज यांच्या उपस्थितीत झाला. या गुंतवणुकीमुळे चाळीस हजार तरुणांना रोजगारनिर्मिती होऊन यामुळे 'आर्थिक सेवा हब'होण्यासाठी पुण्याला मोठी चालना मिळणार आहे. प्रकल्पाच्या जलद अंमलबजावणीसाठी सरकारकडून पूर्ण सहकार्य देण्याचे आश्वासन मी दिले आहे.

- **देवेंद्र फडणवीस,** उपमुख्यमंत्री

# गद्दारीला वर्ष होईल,'पन्नास खोके एकदम ओके' विसरु नका!

## अजित पवारांनी भाजपच्या बालेकिल्ल्यात जाऊन डिवचलं

। नागपूर । महाईन्यूज

**'राज्य सरकारविरुद्ध लोकांमध्ये असलेली खदखद नक्की बाहेर येईल. गद्दारांना शिवसेना धडा शिकवेलच. मात्र, 'पन्नास खोके एकदम ओके तुम्हालाही विसरायचे नाही', असे आवाहन विधानसभेतील विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी शनिवारी कार्यकर्त्यांना केले.**



राष्ट्रवादी काँग्रेस ओबीसी सेलच्यावतीने रेशीमबागेतील महात्मा फुले सांस्कृतिक भवनात प्रशिक्षण शिबिर झाले. शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी पवार बोलत होते. 'मंडल आयोगाच्यावेळी विरोध करणारे भाजप नेते आता मगरीचे अश्रू ढाळत आहेत. ओबीसींच्या आरक्षणाबाबत केंद्र सरकारने डेटा चुकीचा असल्याचे जाणीवपूर्वक सांगितले. तुमचे मंडल तर, आमचे कमंडल ही घोषणा विसरू नका. त्यांना कोणतेच आरक्षण नको. समान नागरी कायद्याबाबतही नागरिकांची प्रतिक्रिया जाणून घेण्याचा छुपा अजेंडा आहे,' अशी तोफही पवार यांनी डागली.

'राज्यात महाविकास आघाडीची सत्ता असताना केंद्राकडून अपेक्षित सहकार्य झाले नाही. मंडलविरोधी ढोंगी नेत्यांचा बुरखा फाडण्याचे काम करा. राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका का घेत नाहीत,' असा सवाल करून पवार म्हणाले, 'गद्दारीला वर्ष होईल. निवडणुका घेण्यापासून त्यांना कुणी अडवले, काय होईल, ही धास्ती त्यांना वाटत आहे. विधान परिषदेत राज्यकर्त्यांचा पराभव झाल्याने त्यांच्या पायाखालची वाळू सरकली.'

'आपले हिंदुत्व तुकाराम, नामदेव यांचे आहे, रेशीमबागेतील संघाचे नाही. शत्रू कोण, मित्र कोण हे ओबीसींना सांगायला हवे', असे ज्येष्ठ विचारवंत हरी नरके म्हणाले. या वेळी ओबीसी सेलचे मावळते अध्यक्ष ईश्वर बाळबुधे यांचा पवार आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या

### राष्ट्रवादीचं नागपूरमध्ये शिबीर
### अजित पवारांची उपस्थिती
### 50 खोके न विसरण्याचं आवाहन

### 'राऊतांनी तारतम्य ठेवून बोलावे'

ठाकरे गटाचे प्रवक्ते खासदार संजय राऊत यांनी केलेल्या टीकेवर अजित पवार यांनी प्रतिहल्ला करण्याचे टाळले. 'महाराष्ट्राची संस्कृती, परंपरा आहे. प्रत्येकाने तारतम्य ठेवून वागावे. ते मोठे आणि महान नेते आहेत. त्यांच्या बोलण्याने अंगाला छिद्र पडत नाही', असे अजित पवार म्हणाले. राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार अमोल मिटकरी यांनी मात्र राऊतांवर हल्ला चढवला. 'खासदार संजय राऊत यांनी कुवत पाहून बोलावे. त्यांनी केलेल्या वक्तव्याबद्दल अजित पवार यांची माफी मागावी', अशी मागणीही मिटकरी यांनी केली. चंद्रपूर, पुणे लोकसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुका होतील. उमेदवाराबाबत योग्य तो निर्णय होईल. मात्र, महाविकास आघाडीला विजयी करण्यासाठी कार्यकर्त्यांनी जीवाचे रान करावे. ओबीसींची जातनिहाय जनगणना व्हावी, यासाठी आपली लढाई सुरूच आहे, असं अजित पवार म्हणाले.

# सईचा ताम्हणकर सोशल मीडियावर नेहमीच ॲक्टिव्ह



मराठी मनोरंजन विश्वातील प्रसिद्ध अभिनेत्री सई ही नेहमीच तिच्या हटकेपणासाठी ओळखली जाते. गेल्या काही वर्षात सईनं बॉलीवूडमध्ये देखील आपल्या नावाची वेगळी मोहोर उमटवली आहे. तिला मीमी या चित्रपटातील भूमिकेसाठी सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेत्रीच्या पुरस्कारानं गौरविण्यात आले होते.

सई ही सोशल मीडियावर नेहमीच ॲक्टिव्ह असणारी सेलिब्रेटी म्हणून तिच्या चाहत्यांना माहिती आहे. तिला इंस्टावर फॉलो करणाऱ्यांची संख्या मोठी आहे. सरत्या वर्षांत एक मोठी शिकवण आपल्याला मिळाली. त्याचा तिला मोठा उपयोग होणार असल्याचे तिनं म्हटले आहे. सई यंदाच्या वर्षी पाँडेचिरी या मराठी चित्रपटामध्येही दिसली होती. त्यातील तिच्या भूमिकेला प्रेक्षकांचा मोठा प्रतिसाद मिळाला होता.

# माजी मुख्यमंत्र्यांच्या घरची सून होणार जान्हवी कपूर?



बॉलिवूड अभिनेत्री आणि श्रीदेवी यांची कन्या जान्हवी कपूरच्या अफेअरच्या चर्चांना उधाण आलं आहे. माजी मुख्यमंत्र्यांच्या नातवाला ती डेट करत असल्याचं दिसून आलं आहे. जान्हवी कपूर माजी मुख्यमंत्री सुशील कुमार शिंदे यांच्या नातवाला शिखर पहाडिया याला डेट करत असल्याच्या चर्चांना उधाण आलं आहे. गेल्या काही दिवसांपासून ते दोघे अनेक ठिकाणी एकत्र दिसत आहे. अनंत अंबानी आणि राधिका मर्चंट यांच्या साखरपुड्यातला एक व्हिडीओ व्हायरल होत आहे.जान्हवी आणि शिखरने एकत्रच या कार्यक्रमाला हजेरी लावली होती. जान्हवीने गुलाबी रंगाची साडी नेसली आहे. त्या आधी अनिल कपूर यांच्या वाढदिवसाच्या निमित्तानेही हे दोघे एकत्र दिसले होते. शिवाय बोनी कपूर यांच्यासोबतही शिखरचा फोटो व्हायरल होत आहे.

# अखेर ठरलं! मनोज बाजपेयी करणार मराठी सिनेमात काम

एक हरहुन्नरी प्रतिभावंत कलाकार म्हणून मनोज वाजपेयी ओळखला जातो. दोन वेळा राष्ट्रीय पुरस्कार मिळवलेल्या या अभिनेत्यानं वैविध्यपूर्ण भूमिका साकारत त्याची वेगळी छाप सोडली आहे. अलीकडे प्रदर्शित झालेल्या 'बंदा' सिनेमातील अभिनयासाठी त्याचं भरभरून कौतुक होतंय. वास्तविक कथांचं, गोष्टींचं प्रतिबिंब सिनेमात नेहमीच दिसून आलं आहे. समाजात घडणाऱ्या गोष्टींना आरसा दाखवण्याचं काम सिनेमे करत असतात. असे सिनेमे तितक्याच प्रामाणिकपणे, सातत्यानं आणि वस्तुनिष्ठ पद्धतीनं बनवले गेले पाहिजेत. 'बंदा' हा सिनेमादेखील असाच सत्यकथा मांडणारा पट आहे. आपल्या आजूबाजूला वेगवेगळ्या सत्यकथा आहेत. यातील काही कथानक समाजासाठी सिनेमातून दाखवणं अत्यंत महत्त्वाचं आहे. कारण, यातूनच आकलन होत समाजाची जडणघडण होत असते.



# एका टर्निंग पॉईंटमुळे राष्ट्रीय क्रश रश्मिकाचं बदललं आयुष्य !



अनेक सुपरहिट चित्रपटांमध्ये काम केलेल्या रश्मिका मंधानाच्या यशाची खूप रंजक कहाणी आहे.अभिनेत्री रश्मिका मंधाना हिने खूप कमी कालावधील चित्रपटसृष्टीत आपले नाव कमावले आहे. अनेक सुपरहिट चित्रपटांमध्ये काम केलेल्या रश्मिका आता राष्ट्रीय क्रश बनली आहे.

रश्मिका मंधानाला नॅशनल क्रशचा टॅग का देण्यात आला आहे, हे तुम्हाला माहीत आहे का? तर त्याची देखील अनेक कारणे आहेत.रश्मिकाने प्रचंड कष्टाच्या जोरावर हे यश मिळवले आहे. भारतासह जगभरात रश्मिकाचे लाखो चाहते आहेत. जाज आपण तिच्या यशाची कहाणी जाणून घेणार आहोत. विशेष म्हणजे तिला चित्रपट क्षेत्रातच यायचे नव्हते. परंतु, एक टर्निंग प्वाईंट मिळाला आणि तिचं सगळ आयुष्यच बदललं.

रश्मिकाला चित्रपटात नाही तर शैक्षणिक क्षेत्रात करियर करायचे होते. त्याचवेळी तिच्या एका शिक्षकाने फ्रेश फेससाठी तिचे नाव दिले. त्यानंतर नाविलाजाने रश्मिलाला स्पर्धेत सहभागी व्हावे लागले. याच्याच माध्यमातून तिने शीर्षक स्वतःच्या नावावर ठेवले आणि आपला पहिला चित्रपट देखील साइन केला.पहिला चित्रपट मिळाल्यानंतरही रश्मिकाला या क्षेत्रात आपण मागे पडेल असे वाटले.रश्मिका एका सामान्य कुटुंबातील आहे. अशा परिस्थितीत आपण अभ्यासाला खूप महत्त्व द्यावे असे तिला वाटत असे. परंतु, थोडंस वेगळं काही तरी केले तर नवीन अनुभव मिळेल असे तिला वाटले आणि तिने पहिल्या चितत्रपटात काम केले. विशेष म्हणजे तिचा पहिलाच चित्रपट चांगलाच गाजला.रश्मिकाचे आतापर्यंत अनेक चित्रपट प्रदर्शित झाले आहेत.

# एफए चषक फुटबॉल स्पर्धा: मँचेस्टर सिटीला जेतेपद!

## गुंडोगनचा पहिला गोल विक्रमी ठरला, सिटीला आघाडी मिळवून दिली

। लंडन ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**कर्णधार इल्काय गुंडोगनच्या दोन गोलच्या बळावर मँचेस्टर सिटीने शनिवारी अंतिम सामन्यात पारंपरिक प्रतिस्पर्धी मँचेस्टर युनायटेडला २-१ असे पराभूत 'एफए चषक' फुटबॉल स्पर्धेचे जेतेपद पटकावले. गुंडोगनचा पहिला गोल विक्रमी ठरला.**



कर्णधार इल्काय गुंडोगनच्या दोन गोलच्या बळावर मँचेस्टर सिटीने शनिवारी अंतिम सामन्यात पारंपरिक प्रतिस्पर्धी मँचेस्टर युनायटेडला २-१ असे पराभूत 'एफए चषक' फुटबॉल स्पर्धेचे जेतेपद पटकावले.गुंडोगनचा पहिला गोल विक्रमी ठरला. सामन्याच्या १३व्या सेकंदालाच गुंडोगनने गोल करत सिटीला आघाडी मिळवून दिली. यानंतर ३३व्या मिनिटाला युनायटेडला पेनल्टी मिळाली. यावर ब्रुनो फर्नांडिसने गोल नोंदवत युनायटेडला १-१ अशी बरोबरी करून दिली. उत्तरार्धात ५१व्या मिनिटाला गुंडोगनने वैयक्तिक व संघाचा दुसरा गोल केला. अखेर हाच गोल निर्णायक ठरला. सिटीने भक्कम बचाव करत 'एफए चषका'चे सातव्यांदा विजेतेपद मिळवले.

तसेच यंदाच्या हंगामात तीन मोठ्या स्पर्धा जिंकण्याचे स्वप्नही सिटीने कायम राखले. सिटीने यापूर्वीच प्रीमियर लीगचे जेतेपद मिळवले असून ते पुढील शनिवारी चॅम्पियन्स लीगच्या अंतिम लढतीत इंटर मिलानविरुद्ध खेळतील. इंटरला नमवण्यात यश आल्यास सिटीचा संघ एकाच हंगामात प्रीमियर लीग, एफए चषक आणि चॅम्पियन्स लीगचे जेतेपद मिळवणारा युनायटेडनंतर (१९९९) केवळ दुसरा संघ ठरेल.

## FIFA मध्ये मेस्सी फिव्हर!



अर्जेंटिना फुटबॉल संघाची शान असलेल्या लिओनेल मेस्सीने आपल्या फुटबॉल कारकिर्दीत आणखी एक विशेष कामगिरी केली आहे. कतारमध्ये २०२२ चा फिफा विश्वचषक जिंकल्यानंतर मेस्सीला आता फिफा प्लेयर ऑफ द इयरचा पुरस्कारही मिळाला आहे.
अर्जेंटिनाचा स्टार फुटबॉलपटू लिऑनला मेस्सीने पुन्हा एकदा आपल्या नावाची छाप सोडली आहे. अर्जेंटिना फुटबॉल संघाचा स्टार आणि अनुभवी फुटबॉलपटू लिओनेल मेस्सी याला पॅरिसमध्ये सोमवारी २७ फेब्रुवारी रोजी फिफा प्लेयर ऑफ द इयर २०२२ चा किताब देण्यात आला आहे. त्यांने प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर डिसेंबर २०२२ मध्ये पहिला फिफा विश्वचषक जिंकला. ज्याचे आयोजन कतारमध्ये करण्यात आले होते. फ्रान्सविरुद्ध खेळल्या गेलेल्या विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात ३५ वर्षीय मेस्सीने आपल्या संघासाठी दोन महत्त्वाचे गोल केले. हा अंतिम सामना ३-३ असा बरोबरीत सुटल्यानंतर पेनल्टीमध्ये गेला. या पेनल्टीमध्ये जिंकून अर्जेंटिनाने तब्बल ३६ वर्षांनंतर विश्वचषकाची सुवर्ण ट्रॉफी जिंकली. लिओनेल मेस्सी व्यतिरिक्त, अर्जेंटिनाला विश्वचषक जिंकण्यात मोलाचा वाटा असणारे त्यांचे प्रशिक्षक लिओनेल स्कालोनी यांची फिफा २०२२ मधील सर्वोत्तम प्रशिक्षकासाठी निवड करण्यात आली आहे. एवढेच नाही तर अर्जेंटिनाला ३६ वर्षांच्या प्रदीर्घ कालावधीनंतर विश्वचषक जिंकून देण्यात त्यांचा कीपर एसी मार्टिनेझने महत्त्वाची भूमिका बजावली.

# नक्षलग्रस्त गडचिरोली जिल्ह्यातील आदिवासी विद्यार्थ्याची यशस्वी झेप!

## गडचिरोलीमधील महेश भारतीय संघातून हॉकी खेळणार

। गडचिरोली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**कर्णधार हरमनप्रीत सिंगने नोंदवलेल्या दोन गोलच्या जोरावर भारताने प्रो लीग हॉकीमध्ये शुक्रवारी ऑलिम्पिक विजेत्या बेल्जियमला ५-१ असे पराभूत केले. प्रो लीगच्या युरोप दौऱ्यात सलग दोन सामने गमावल्यानंतर भारताला विजयी पुनरागमन करण्यात यश आले. भारताचा आज, शनिवारी ग्रेट ब्रिटनशी सामना होईल.**



गडचिरोलीमधील नक्षलग्रस्त भागातील महेश नामक मुलाने भारतीय संघाच्या अंडर-१९ टीममध्ये आपल्या खेळाने जागा मिळवली आहे. आता तो भारतीय संघातून हॉकी खेळताना दिसणार आहे.

दुर्गम भागात खडतर परिस्थितीत विविध आव्हानांना सामोरे जात आपल्या खेळाप्रती श्रद्धा असणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्याने प्रतिकूल परिस्थितीत केवळ जिद्द आणि मेहनत याची सांगड घालत जिल्ह्याचं शेवटच्या टोक असलेल्या सिरोंचा तालुक्यातील नक्षल प्रभावित,अतिदुर्गम अशा रोमपल्ली येथील महेश ईरपा मडावी या विद्यार्थ्याने हॉकीत कौशल्य दाखवीत थेट देशपातळीवरील अंडर १९ हॉकी स्पर्धेसाठी आपली निवड सार्थ ठरविली आहे. त्याच्या या यशाने पुन्हा एकदा आदिवासीबहुल गडचिरोली जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. राज्याचे शेवटचं टोक आणि नक्षल प्रभावित म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सिरोंचा तालुक्यातील मदाराम ग्रामपंचायत हद्दीतील ही छोटीशी आदिवासीबहुल गावावस्ती. या गावात महेश मडावी याचा जन्म झाला. प्राथमिक शिक्षण सिरोंचा येथील तालुका मुख्यालयात असलेल्या ज्ञानदीप इंग्लिश मीडियम स्कूल येथे घेतल्यानंतर इयत्ता सहावी ते आठवीचे शिक्षण चंद्रपूर जिल्ह्यातील शिंदेवाही येथील दिव्याने इंटरनॅशनल स्कूल येथे सुरू होते.

# नोव्हाक जोकोव्हिचने जिंकले विक्रमी २२ वे ग्रँडस्लॅम जेतेपद!

। मेलबर्न ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।



ऑस्ट्रेलिया ओपनमधील अंतिम सामना आज नोव्हाक जोकोविच आणि स्टेफानोस सित्सिपास यांच्यात खेळवला गेला. या सामन्यात सर्बियाचा अनुभवी टेनिसपटू नोव्हाक जोकोविचने ऑस्ट्रेलियन ओपन पुरुष एकेरीचे विजेतेपद पटकावले आहे. अंतिम फेरीत जोकोविचने ग्रीसच्या स्टेफानोस सित्सिपासचा पराभव केला. जोकोविचने २ तास ५६ मिनिटे चाललेला हा सामना ६-३, ७-६, ७-५ असा जिंकला. या विजयासह जोकोविच एटीपी क्रमवारीत जगातील अव्वल क्रमांकाचा पुरुष खेळाडू बनला आहे.

२४ वर्षीय सित्सिपास अजूनही त्याच्या पहिल्या ग्रँडस्लॅम विजेतेपदाच्या प्रतीक्षेत आहे. यापूर्वी तो २०२१ मध्ये फ्रेंच ओपनच्या अंतिम फेरीत पोहोचला होता. तेथेही त्याचा जोकोविचविरुद्ध पराभव झाला. त्यानंतर सित्सिपासने पहिले दोन सेट जिंकले, पण जोकोविचने पुनरागमन करत पुढील तीन सेट जिंकून ट्रॉफीवर आपले नाव कोरले आहे.